# SCIENCE DAY

# 28-02-2019



Inauguration of Science Day






Model Competition

**श्री जीवनराव सिताराम पाटील मुनघाटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा**
**जिल्हा–गडचिरोली**
**समाजशास्त्र विभाग**
**2022–23**

**संशोधन कार्य पध्दती कार्यशाळा अहवाल**

**दिनांक 7 आक्टोंबर 2022**

महाविद्यालयात राइस (राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र) अभ्यासमंडळ कार्यरत असून या माध्यमातुन विद्यार्थ्यांसाठी अभ्यागत व्याख्यान, कार्यशाळा, चर्चासत्र यांचे वेळोवेळी आयोजन करण्यात येते.

सत्र 2022–23 मध्ये 7 आक्टोंबर 2022 ला संशोधन पध्दती या विषयावर कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड व संशोधनवृत्ती वाढीस लागावी यासाठी तसेच विद्यापीठाने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार बि.ए. भाग 3 (सत्र 5 व 6) च्या विद्यार्थ्यांना सामान्य संशोधनपध्दती व अहवाल लेखन आवश्यक केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना संशोधन पध्दती विषयी अधिका–अधिक माहिती प्राप्त व्हावी याकरीता संशोधन पध्दती कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेसाठी प्रमुख विषयतज्ञ म्हणून डॉ. रजनी वाढई सहायक प्राध्यापक, पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, डॉ. नंदाजी सातपूते राज्यशास्त्र विभाग प्रमुख महिला महाविद्यालय गडचिरोली तसेच डॉ. प्रमोद बोधाने इतिहास विभाग प्रमुख महिला महाविद्यालय गडचिरोली यांना आमंत्रीत करण्यात आले होते.

दिनांक 7 आक्टोंबर 2022 ला प्र. प्राचार्य डॉ. पंकज चव्हान यांच्या अध्यक्षतेखाली हि कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. पंढरी वाघ, इतिहास विभागप्रमुख डॉ. राजू किरमिरे आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश बनसोड उपस्थित होते.

प्रस्तुत कार्यशाळेत डॉ. रजनी वाढई यांनी अहवाल लेखन या विषयावर बोलतांना विद्यार्थ्यांना संशोधन विषयाची निवड, महत्त्व, माहितीचे संकलन, विष्लेशन, आणि अहवाल लेखन याविषयावर विस्तृत माहिती देवून विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. डॉ. सातपुते यांनी माहितीचे संकलन कसे करायचे याबद्दल उदाहरणांसह विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्याच सोबत डॉ. बोधाने यांनी इतिहासातील विषयावर संशोधन कसे करावे याबाबत माहिती देवून

संदर्भ ग्रंथ व ग्रंथालयाचा संशोधनात कसा वापर करावा या बाबत विद्यार्थ्यांना विस्तृत मार्गदर्शन केले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश बनसोड यांनी संपुर्ण कार्यक्रमाचे संचालन केले तर डॉ. राजू किरमिरे इतिहास विभाग प्रमुख यांनी राइस अभ्यास मंडळाची पार्श्वभूमी मांडुन कार्यक्रमाचे प्रास्तावीक केले. समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. पंढरी वाघ यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

कार्यशाळेसाठी महाविद्यालयीन प्रा. डॉ. गणेश चुदरी, डॉ. विना जंबेवार, डॉ. हरीष लांजेवार, ग्रंथपाल डॉ. गोहणे, डॉ. झाडे, डॉ. प्रियंका पठाडे, प्रा. गीताचंद्र भैसारे उपस्थित होते. कार्यशाळेत पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणारे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

दिनांक 01 नोव्हेंबर 2022

समाजशास्त्र विभागप्रमुख

प्रा. डॉ. पी. एन. वाघ

श्री जी.सी. पाटील मुनघाटे महाविद्याय धानोरा

# मुनघाटे महाविद्यालयात राइस अभ्यास मंडळांतर्गत संशोधन पद्धतीवर कार्यशाळा संपन्न

By Dakhal News Bharat

OCT 7, 20 धानोरा /भाविक करमनकर




स्थानिक, धानोरा येथील श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था अंतर्गत श्री जिवनराव सिताराम पाटील मुनघाटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राइस अभ्यास मंडळाअंतर्ग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मंचावर उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पंकज चव्हाण होते तर प्रमुख पाहुणे प्राध्यापक डॉ नंदाजी सातपुते राज्यशास्त्र विभाग प्रमुख महिला महाविद्यालय गडचिरोली, प्राध्यापक डॉ प्रमोद बोधाने प्राध्यापिका डॉ रजनी वाढई पीजीटीडी समाजशास्त्र विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तसेच प्राध्यापक डॉ पंढरी वाघ प्राध्यापक डॉ राजु किरमीरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे आराध्य दैवत श्री साईबाबा यांच्या प्रतिमेला अभिवादन करून व विद्यापीठ गीताने करण्यात आली.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सामाजिक संशोधन पद्धतीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संशोधनाचा विषय कसा निवडावा यावर उपस्थित मान्यवरांनी प्रकाश टाकला. या प्रसंगी गोंडवाना विद्यापीठात विद्या परीषेदेवर निवडून आलेले डॉ नंदाजी सातपुते यांचा राज्याशास्त्र विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.तसेच डॉ बोधाने सरांचा इतीहास विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला तर डॉ रजनी वाढई मॅडम यांचा समाजशास्त्र विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ राजु किरमीरे यांनी केले,तर सूत्रसंचालन प्रा ज्ञानेश बनसोड यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ पंढरी वाघ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ गणेश चुदरी सर, डॉ विणा जंबेवार मॅडम डॉ हरीष लांजेवार सर, डॉ सचिन धवनकर डॉ प्रियांका पठाडे, प्रा नितेश पुण्यप्रेड्डीवार व विद्यार्थ्यांनी सहकार्य करुन कार्यक्रम यशस्वी केला.

दि. १४/१०/२०२२


# मुनघाटे महाविद्यालयात कार्यशाळा



देशोन्नती वृत्तसंकलन...

**धानोरा** - श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था अंतर्गत श्री जिवनराव सिताराम पाटील मुनघाटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राइस अभ्यास मंडळाअंतर्ग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंकज चव्हाणे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नंदाजी सातपुते, डॉ. प्रमोद बोधाने, डॉ. रजनी वाढई, डॉ. पंढरी वाघ, डॉ. राजु किरमीरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सामाजिक संशोधन पद्धतीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संशोधनाचा विषय कसा निवडावा यावर उपस्थित मान्यवरांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.राजु किरमीरे यांनी केले. संचालन प्रा. ज्ञानेश बनसोड यांनी केले तर आभार डॉ. पंढरी वाघ यांनी मानले. (ता.प्र.)

# पवार महाविद्यालयात जंतनाशक दिन





देशोन्न

क
२० प
अवसा
त्यादिश
आहे.
ग्रामीण
विद्यार्थ्य
व सर्त्त
आहे.
प्राथमिव
कुरखेड
राजकीर
पदाधिक
शैक्षणिव
असल्या

# प्रयास

वार्षिकांक २०१८-१९



श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोली
द्वारा संचालित

## श्री जीवनराव सीताराम पाटील मुनघाटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धानोरा

Website : www.shrijspm.org | Email : shrijspm_dha@rediffmail.com

Scanned with OKEN Scanner



गोंडवाना विद्यापीठाचा 'रासेयो उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार' स्विकारतांना कु. विश्वेश्वरी दा. पुडो व इतर मान्यवर




माजी विद्यार्थी मेळाव्याप्रसंगी उपस्थित संस्थेच्या सचिव श्रीमती शालीनीताई मुनघाटे व व्यासपीठावर इतर मान्यवर



समाजशास्त्र शतकपूर्ती सोहळ्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. पी. एन. वाघ व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर



मराठी भाषा गौरव दिनानिमित्य मनोगत व्यक्त करतांना डॉ. गणेश चुधरी व इतर मान्यवर



गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत चंद्रगुप्त कुनघाडकर सुवर्ण पदकाने सन्मानित



इतिहास विभागाद्वारे आयोजित 'इतिहास योगाचा' या विषयावर कार्यशाळा



श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था, गडचिरोली
द्वारा संचालित

# प्रयास

वार्षिकांक २०१८-१९

## श्री जीवनराव सीताराम पाटील मुनघाटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धानोरा

Website : www.shrijspm.org
Email : shrijspm_dha@rediffmail.com

Scanned with OKEN Scanner